MHPA170001832026

दिवाणी कि. अर्ज क्र.२७/२०२६
अब्दुल मुजीब व इतर वि. निरंक.

**नि.क्र.१ वर आदेश**

(दिनांक २२ एप्रिल, २०२६ रोजी पारीत)

१. अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ प्रमाणे सदरचा अर्ज हा मृतक क्र.१ अब्दुल रब अब्दुल रौफ, मृतक क्र.२ रहेमतबी अब्दुल रौफ, मृतक क्र.३ अब्दुल रशिद अब्दुल रौफ आणि मृतक क्र.४ अब्दुल नय्युम अब्दुल रौफ यांचे ते वारस असल्याबाबत वारस दाखला प्राप्त करण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे कथन थोडक्यात असे आहे की, अर्जदार क्र.१ हा मृतक क्र.१,३ आणि ४ यांचा सख्खा भाऊ असुन मृतक क्र.२ चा मुलगा आहे. अर्जदार क्र.२ ही मृतक क्र.१,३ आणि ४ यांची सख्खी बहिण असुन मृतक क्र.२ ची मुलगी आहे. अर्जदार क्र.३ ही मृतक क्र.३ याची पत्नी असुन अर्जदार क्र.१ व २ यांची भावजई व अर्जदार क्र.४ ते ७ यांची आई आहे. अर्जदार क्र.४ ते ७ हे मृतक क्र.३ याची मुले व मृतक क्र.१ व ४ यांचे पुतणे आहेत आणि मृतक क्र.२ चे नातु आहेत. मृतक क्र.१ अब्दुल रब अब्दुल रौफ याचा मृत्यु दिनांक २४/०९/२००२, मृतक क्र.२ रहेमतबी अब्दुल रौफ हिचा मृत्यु दिनांक ०९/०९/२००१, मृतक क्र.३ अब्दुल रशिद अब्दुल रौफ याचा मृत्यु दिनांक १६/०४/२०१४ आणि मृतक क्र.४ अब्दुल नय्युम अब्दुल रौफ याचा मृत्यु दिनांक

२९/०३/२०२३ रोजी झाला असून ते जिंतुर, ता.जिंतुर, जि.परभणी येथील कायमचे रहिवासी होते. अर्जदार क्र.१ व ४ हे अविवाहित होते. त्यांच्या मृत्युनंतर अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस असुन अर्जदारांशिवाय मृतकांना कोणीही कायदेशीर वारस नाहीत. करीता अर्जदारांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

३. अर्जदारांनी त्यांच्या अर्जाचे पृष्ठर्थ अर्जदार क्र.६ याचा पुरावा प्रतिज्ञालेख (नि.क्र.१०) दाखल करुन त्याला तपासले. त्याच्या पुराव्यातुन मृतक क्र.२,१,३ आणि ४ यांच्या मृत्यु प्रमाणपत्राच्या पडताळणी केलेल्या प्रती (अनुक्रमे नि.क्र.११ ते १४) आणि मृतक क्र.४ व अर्जदार क्र.१ ते ७ यांच्या आधार कार्डच्या पडताळणी केलेल्या प्रती (अनुक्रमे नि.क्र.१५ ते २२) हे दस्तऐवज सिध्द होतात. न्यायालयाने प्रकरणात हरकती बोलाविण्याकरीता जाहीर नोटीस प्रकाशित केली व त्याचा अहवाल (नि.क्र.०७) दाखल आहे. न्यायालयाने वृत्तपत्रात जाहीरनामा प्रकाशित करण्याचा सुध्दा आदेश दिला. अर्जदारांनी वृत्तपत्रात प्रकाशित करण्यात आलेला जाहिरनामा दिनांक २९/०१/२०२६ (नि.क्र.२३) दैनिक गोदातीर समाचार या वृत्तपत्रात दिला व तो सदर प्रकरणात दाखल केला आहे. अर्जदारांनी पुरसिस (नि.क्र.२४) द्वारे त्यांचा पुरावा बंद केला.

४. प्रस्तुतचे प्रकरणात आजपर्यंत कुठलीही हरकत न्यायालयास प्राप्त झालेली नाही. मृतक क्र.२ रहेमतबी अब्दुल रौफ हिच्या मृत्युनंतर मृतक क्र.१, मृतक क्र.३, मृतक क्र.४, अर्जदार क्र.१ आणि अर्जदार क्र.२ हे तिचे वारस ठरतात. मृतक क्र.१

अब्दुल रब याच्या मृत्युनंतर मृतक क्र.३, ४, अर्जदार क्र.१ आणि २ हे त्याचे वारस ठरतात. मृतक क्र.३ याच्या मृत्यु नंतर अर्जदार क्र.३ ते ७ हे त्याचे वारस ठरतात आणि मृतक क्र.४ याच्या मृत्युनंतर अर्जदार क्र.१ आणि २ हे त्याचे वारस ठरतात. त्या कारणास्तव, मुस्लीम कायद्याप्रमाणे मृतक रहेमतबी आणि मृतक अब्दुल रब यांचे वारस सर्व अर्जदार ठरतात. परंतु, मृतक अब्दुल रशीद याचे वारस अर्जदार क्र.३ ते ७ ठरतात आणि मृतक अब्दुल नय्युम याचे वारस अर्जदार क्र.१ आणि २ ठरतात. त्यामुळे त्यांना कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यास न्यायालयास कुठलीही अडचण दिसुन येत नाही. वरील परिस्थिती लक्षात घेता न्यायालय खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. सर्व अर्जदार हे मृतक रहेमतबी अब्दुल रौफ आणि मृतक अब्दुल रब अब्दुल रौफ यांचे वारस आहेत असा दाखला देण्यात यावा.

३. अर्जदार क्र.३ ते ७ हे मृतक अब्दुल रशिद अब्दुल रौफ याचे वारस आहेत असा दाखला देण्यात यावा.

४. अर्जदार क्र.१ आणि २ हे मृतक अब्दुल नय्युम अब्दुल रौफ याचे वारस आहेत असा दाखला देण्यात यावा.

५. सदरचा दाखला हा अर्जदार हे संबंधीत मृतकांचे वारस आहेत ही औपचारीक मान्यता देण्यासाठी देण्यात येत आहे व वारस दाखल्याचा उपयोग तेवढाच मर्यादीत आहे.

६.	दाखला देण्यापुर्वी अर्जदार यांच्याकडुन योग्य ती कोर्ट फी भरुन घेण्यात यावी.

७.	अर्जाचा खर्च अर्जदारांनी सोसावा.

(आदेश खुल्या न्यायालयात थेट संगणकावर निर्देशित व टंकलिखीत करुन घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by NIKHIL PRADEEP TALNIKAR
Date: 2026.04.22 17:44:14 +0530

( नि. प्र. तळणीकर )
दिवाणी न्यायाधीश (क. स्तर),
दिनांक २२/०४/२०२६.	जिंतूर.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | :- | Ku. S. V. Vishnupurikar |
| Court Name | :- | Civil Judge J. D., Jintur. |
| Date | :- | 22/04/2026 |
| Signed by Presiding Officer on | :- | 22/04/2026 |
| Uploaded on | :- | 22/04/2026 |